## माहे नोव्हेंबर २०२२ महाचा मासिक अहवाल

## मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | विराट डॉबरमॅन मेल | १) पोहवा/८०० एम.ई.हरचिरकर<br>२) पोहवा/४४१ एस. एस. कोतवडेकर | सावर्डे पो. स्टे. गु. र. नं. ९८/२०२२ भा. द. वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे हा गुन्हा दि.२३/११/२०२२ रोजी २१:०६ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर फिर्यादींचे राहते घराचे मागील पश्चिमेकडील दरवाजाचे बाहेरील पायरीवर चोरीतील केशरी रंगाची पिशवी पडलेली होती. सदर संशयीत पिशवीतील पर्सचा वास श्वान विराट यास दिला असता तो वास घेत घेत घराचे मागील परीसरातुन उत्तर दिशेला असलेल्या वाडीतील गल्लीतुन फीर्यादींचे घराचे पुढील अंगणात आला तिथे उभे असलेल्या लोकांमधून एका व्यक्तीचा वास घेवुन अंगावर उडी मारून भुंकून इशारा दिला सदर इसमास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिलेली आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | रत्नागिरी | विराट डॉबरमॅन मेल | १) पोहवा/८०० एम.ई.हरचिरकर<br>२) पोहवा/४४१ एस. एस. कोतवडेकर | खेड पो. स्टे. गु.र.नं. ३०९/२०२२ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे हा गुन्हा दि.५/११/२०२२ रोजी ००:१३ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर गुन्हा करतेवेळी वापरलेल्या काथ्याचे रस्सीचा वास श्वान विराट यास दिला असता श्वान विराट हा वास घेत घेत घटनास्थळावरून मयत महिलेच्या खोलीला लागून असलेल्या दुस-या खोलीत राहणा-या संशयीत इसम नामे कादरबादशा काशिमसाब नदाफ याचे जवळ जावून वास घेवून घुटमळून भुंकू लागला सदर इसमास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | रायगड | ऑस्कर डॉबरमॅन मेल | १) पोहवा/१४४७ एन.पी.माळवी<br>२) पोहवा/२१३२ एम.बी.निगडे | रेवदंडा पो. स्टे. गु.र.नं. २५०/२०२२ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे हा गुन्हा दि.१५/११/२०२२ रोजी ०७:३८ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर पडलेल्या रूमालाचा वास श्वान ऑस्कर यास दिला असता श्वान ऑस्कर हा वास घेत घेत घटनास्थळा पासून सागवाडी जंगल भागातुन पश्चिमेस पायवाटेने धावत जावुन ३ - ४ किमी घोटवडे जंगल भागात जावुन चिंचेच्या झाडाखाली बसलेल्या इसमावर भुंकू व उडया मारू लागला सदर इसमास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे. |



**अशा प्रकारे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत खून - २, घरफोडी - १ असे एकुण - ३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**